ISSN 2277-8063

September 2019

Vol. VIII / Issue - III / 2019

# Navjyot

नवज्योत

## International Interdisciplinary Research Journal
## [ Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management]

Chief Editor
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Head, Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

Editor
**Dr. Pyarelal Suryawanshi**
Prof. Rajabhau Deshmukh
Mahavidyala,Nandgaon,(kh)
Dist.-Amravati.

*- Published by-*
**HOUSA Publication, Kolhapur.**

Scanned by CamScanner

# CONTENTS



| S.N. | Subject | Title | Author | P. No. |
|---|---|---|---|---|
| 1 | हिंदी | मराठी और हिंदी साहित्य में दलित चिन्तन | प्रा.शरद बा. शिरोडकर | 1-5 |
| 2 | मराठी | उदय प्रकाश यांच्या कथांतील जीवनानुभव | गुरुदत्त म्हाडगुत | 6-8 |
| 3 | मराठी | कोकणातील संस्कृती व नाथ संप्रदाय | भक्ती गोविंद महाजन | 9-13 |
| 4 | राज्यशास्त्र | भारतीय संविधान आणि बुद्ध धम्म | प्रा. राजरतन शा. जाधव | 14-18 |
| 5 | राज्यशास्त्र | भारतीय संविधानाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन | प्रा. आनंदा कांबळे | 19-23 |
| 6 | राज्यशास्त्र | कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांची स्थिती : एक अभ्यास | प्रा. नंदकुमार कोल्हापूरे | 24-30 |
| 7 | राज्यशास्त्र | ७२ वी घटना दुरुस्ती व ग्रामसभेची ग्रामविकासातील भूमिका | दौलत भुजंगा साळवे | 31-33 |
| 8 | समाजशास्त्र | रत्नागिरी जिल्ह्यातील मत्सविक्री करणाऱ्या स्त्रियांचा सामाजिक आणि आर्थिक अभ्यास | अर्चना बी. शिवदाय | 34-36 |
| 9 | इतिहास | रत्नागिरी जिल्ह्यातील गणेश मंदिराचा एक दृष्टीक्षेप | प्रा. अजय श्रीपती पाटील | 37-42 |
| 10 | ग्रंथालय व माहितीशास्त्र | सार्वजनिक ग्रंथालयातील मराठी दोलामुद्रीतांच्या सद्यस्थितीचा शोध | मधुकर दिनकर पाटील<br>डॉ. नमिता खोत | 43-45 |
| 11 | जनसंवाद व विद्याविभाग | कोल्हापुरातील मराठा क्रांती मूक मोर्चाला वर्तमानपत्रांनी दिलेले स्थान : दैनिक पुढारी व दैनिक सकाळ एक तौलनिक अभ्यास | साधना रामचंद्र काळे | 46-49 |
| 12 | मराठी | विंदांच्या कवितांचे स्त्रीवादी आकलन | प्रा. गुंडूराव यल्लापा कांबळे | 50-52 |
| 13 | राज्यशास्त्र | यशवंतराव चव्हाण : केंद्र शासनातील एक संसदपटू | डॉ. अरुण आर. गाडे<br>प्रा. विशाल लहू कांबळे | 53-59 |
| 14 | मराठी | परिवर्तनवादी प्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. प्रकाश आप्पासो हुलेनवर | 60-62 |
| 15 | English | Dalit Literature: A Social Perspective | Kalebag Vijay Sopan | 63-66 |





Scanned by CamScanner

 ISSN 2277-8063

# कोल्हापूर जिल्हयातील दलितांची स्थिती: एक अभ्यास

प्रा. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, कोल्हापूर.

कोल्हापूर जिल्हा हा पुरोगामी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात राजर्षी शाहू महाराजांनी दलितांच्या उन्नतीसाठी व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी विविध निर्णय घेतले. दलितांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये अनुसूचित जातीसाठी विविध तरतुदी केल्या. केंद्र व राज्य सरकारने दलितांच्या उन्नतीसाठी विविध सवलती व योजना राबवल्या आहेत. या लेखात कोल्हापूर जिल्हयातील दलितांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला आहे. या संशोधन लेखाची उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहे.

१) कोल्हापूर जिल्हयातील दलितांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थितीमध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

या उद्दिष्टांच्या आधारे कोल्हापूर जिल्हयातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी खालील गृहितक मांडलेले आहे.

१) कोल्हापूर जिल्हयातील दलितांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थितीमध्ये बदल झाला आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत लेखामध्ये सर्वक्षण व ग्रथालयीन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. या लेखात प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे.

**प्राथमिक साधने**

कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील ६० गावातील ३४६ नागरिक व १३३ लोक प्रतिनिधी नागरी भागात ६२ नागरिक व नागरी भागातील २० नागरीक ६२ लोक प्रतिनिधी इत्यादींच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. याचबरोबर निरीक्षण पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

**दुय्यम साधने**

लेख, पुस्तके, जनगणना अहवाल, इत्यादींचा समावेश दुय्यम साधनामध्ये करण्यात आला आहे.

**कोल्हापूर जिल्ह्याची भौगोलिक स्थिती**

कोल्हापूर जिल्ह्याची भौगोलिक स्थितीमध्ये कोल्हापूर जिल्ह्याचे स्थान व व्याप्ती खालीलप्रमाणे दिलेली आहे.

**स्थान**

कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडून नैऋत्य पठारी भागावर उत्तर अक्षांशावर १५° ते १७° वसला असून जिल्ह्याच्या पश्चिमेस सहयाद्रीच्या कडा, उत्तरेस वारणा नदी, पूर्वेस अंशत: कृष्णा नदी व दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हा अशा चतु:सीमा आहेत. जिल्ह्यातील बहुतांश भागाची समुद्र सपाटीपासून उंची ३९० ते ६०० मीटर इतकी आहे.

**व्याप्ती**



Scanned by CamScanner